सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

**"अ" मार्ग, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.**

दिनांक २२/०६/२०२३ रोजी नियामक परिषद शासकीय विधी महाविद्यालय, मुंबईच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने मंजूर केलेल्या **सहाय्यक प्राध्यापक, (विधी),** शासकीय विधी महाविद्यालय, "अ" मार्ग, चर्चगेट, मुंबई ४०००२० या पदावर नेमणूक करण्याकरिता आवेदनपत्रे मागवित आहोत.

**सहाय्यक प्राध्यापक, (विधी) : एकूण पदे १२**

**अ. जा.- ०३**

**विजाअ- १**

**भ.ज.(ब)- ०१**

**भ.ज.(क)- ०१**

**भ.ज.(ड)- ०१**

**इमाव- ०३**

**आदुघ- ०१**

**खुला प्रवर्ग-: ०१**

**सूचनाः * प्रस्तुत जाहिरातीच्या माध्यमातून सुरु झालेल्या निवड प्रक्रियेमुळे यापुर्वी दि. २२/०२/२०१९ रोजी मंजुर झालेल्या आणि दि. ०७/०३/२०१९ रोजीच्या जाहिरातीनुसार सहाय्यक प्राध्यापक, (विधी), शासकीय विधी महाविद्यालय या पदावर सुरु झालेली निवड प्रक्रिया रद्द झालेली आहे. दि. ०७/०३/२०१९ रोजीच्या जाहिरातीमध्ये आवेदनपत्रे दिलेल्या उमेदवारांपैकी प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या नियमानुसार पात्र असलेल्या उमेदवारांनी पुन्हा नव्याने आवेदनपत्रे देणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्यांना प्रस्तुत निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल.**

सदरच्या जाहिरातीमधील पदांची उपलब्धता, आरक्षण इत्यादी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.
**१. अ. जा., विजाअ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इमाव, आणि आदुघ (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक)** या प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदांवर त्याच प्रवर्गातील उमेदवाराची निवड केली जाईल.

**२. अ. जा., विजाअ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इमाव** या प्रवर्गातून आवेदन पत्रे दाखल करणा-या उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच **विजाअ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इमाव** या प्रवर्गातून आवेदन पत्रे दाखल करणाऱ्या उमेदवारांनी दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत (नॉन क्रीमीलेअर) प्रमाणपत्र (कुटुंबाच्या उत्पन्नाच्या आधारावर) दाखल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे **आदुघ (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक)** या प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदावर अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेचे प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

**३.** उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांनी गठित केलेल्या निवड समितीने सदरच्या जाहिरातीमध्ये परिवर्तन करणे, सुधारणा करणे, काही भाग वगळणे आणि सदरची जाहिरात पूर्णपणे रद्द करणे हे अधिकार राखून ठेवले आहेत.

**४. सदरच्या** जाहिरातीचा, **पदांच्या आवेदनपत्राचा विहीत नमूना** पात्रतेसंदर्भातील सविस्तर माहिती, अनुभव व पदांच्या नियुक्ती संदर्भातील इतर अटी इत्यादी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांच्या **संकेत स्थळावर (https://jdhemumbai.org.in) वर उपलब्ध असून त्या तेथून प्राप्त करुन** सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कुल आवार, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मेट्रो सिनेमाजवळ मुंबई-४०० ००१ या पत्त्यावर **सदरची आवेदनपत्रे अशा पध्दतीने पाठवावीत की, ती जाहिरात प्रकाशित झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत प्राप्त होतील.**

**५.** जे उमेदवार सेवेमध्ये कार्यरत असतील त्यांनी सदरच्या पदाकरीता विहीत मार्गाने (प्रॉपर चॅनल) ने अर्ज करावेत आणि त्यांच्या सद्याच्या कार्यरत सेवेतील कार्यालय प्रमुखांकडून ना-हरकत प्रमाणपत्र मुलाखतीस येतांना सोबत आणावे अन्यथा जर त्यांना वेतनश्रेणी संरक्षण आणि मागील सेवा जोडून उमेदवारास काही लाभ देय असतील तर ते मिळणार नाहीत.

**६.** उमेदावारांनी सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग यांच्या संकेतस्थळावर **(https://jdhemumbai.org.in)** जाऊन **"सहाय्यक प्राध्यापक (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई" पदावर नियुक्ती संदर्भात महत्त्वाच्या सूचनांचे काळजीपुर्वक वाचन करुन त्यानुसार कार्यवाही करावी. उमेदवारांनी सदरच्या संकेतस्थळावरुन निवडप्रक्रियेच्या बाबतीत पुढील कार्यवाहीची माहिती घ्यावी आणि वेळोवेळी त्यांच्या ई-मेल आयडींची तपासणी करुन निवड प्रक्रियेबाबत सूचना प्राप्त करुन घ्याव्यात**.

**७. सहाय्यक प्राध्यापक (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई पदाची पात्रता, अनुभव, वेतनश्रेणी संबंधित तपशिल** विद्यापिठ अनुदान आयोग आणि शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आहे. उमेदवारांनी सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग यांच्या **संकेतस्थळावर (https://jdhemumbai.org.in) जाऊन त्यानुसार पात्र असल्यास प्रस्तुत पदाकरीता आवेदन पत्रे पाठविणे आवश्यक आहे.**

**८. इतर अटी :-**

१. खुल्या प्रवर्गाव्यतिरिक्त आरक्षित प्रवर्गासाठी आवेदन पत्र दाखल करणारा उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (Domiciled) असणे आवश्यक आहे. त्यासंबंधीचे अधिवासी (Domiciled) प्रमाणपत्र आवेदनपत्रासोबत जोडण्यात यावे.

२. वयोमर्यादा:- खुला प्रवर्ग- वय वर्ष ४० पेक्षा अधिक नसावे तसेच आरक्षित प्रवर्ग- वय वर्ष ४५ पेक्षा अधिक नसावे.

३. विहित केलेली शैक्षणिक गुणवत्ता, API गुणांकन, अनुभव उमेदवारांनी जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकास धारण केलेली असावी.

**सही/-**

**सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग**

**सहाय्यक प्राध्यापक (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई पदाची पात्रता, अनुभव, वेतनश्रेणी संबंधित तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

सहाय्यक प्राध्यापक, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई पदाची वेतन संरचना आणि किमान पात्रता, पे बँड AL १० : रु. ५७,७००- रु. १,०१,१०० अशी असेल.

**ए. १.** भारतीय विद्यापीठाची संबंधीत विषयामध्ये पदव्युत्तर पदवी (एल.एल.एम.) ही चांगल्या शैक्षणिक मानांक की जो त्या विद्यापीठाने परिभाषित केलेला आहे किमान ५५% गुणांसह (अथवा समकक्ष श्रेणी, पॉईंट स्केल पध्दतीनुसार, की जेथे श्रेणीपध्दती अस्तित्त्वात आहे) अथवा समकक्ष पदवी जी मानांकित परदेशी विद्यापीठाकडून मिळविलेली असेल. करीता शासन निर्णय क्र. Misc-2018/C.R.56/18/UNI-1 Page 6 of 60 पहावा.

सरळसेवा भरतीने शिक्षकांची आणि इतर श्रेणीतील समकक्ष संवर्गाकरीता पदव्युत्तर पदवी (एल.एल.एम.) किमान ५५% गुणांसह अथवा समकक्ष श्रेणी, पॉईंट स्केल पध्दतीनुसार, की जेथे श्रेणीपध्दती अस्तित्त्वात आहे ही आवश्यक पात्रता असेल.

खालील संवर्गांकरीता पदवी तसेच पदव्युत्तर स्तरावर ५% गुणांची सवलत देण्यात येत आहे. नामे अनुसूचीत जाती, अनुसुचित जमाती, इतर मागास वर्ग (उन्नत व प्रगत गटात मोडत नसणारे), Differently- abled ((a) Blindness and low vision; (b) Deaf and Hard of Hearing; (c) Locomotor disability including cerebral palsy, leprosy cured, dwarfism, acid-attack victims and muscular dystrophy; (d) Autism, intellectual disability, specific learning disability and mental illness; (e) Multiple disabilities from amongst persons under (a) to (d) including deaf-blindness) ही सवलत सरळसेवा भरतीमध्ये पात्रता आणि चांगल्या शैक्षणिक मानांकाचे मुल्यमापन करताना लागू असेल. किमान पात्रतेचे ५५% गुण (अथवा समकक्ष श्रेणी, पॉईंट स्केल पध्दतीनुसार, की जेथे श्रेणीपध्दती अस्तित्त्वात आहे) आणि त्यामध्ये ५% गुणांची सवलत ही वरील प्रवर्गांना त्यांनी पात्रता गुण हे श्रेणी सुधारणा गुणांशिवाय (Grace Marks) मिळविले असल्यास देय असेल.

५% गुणांची सवलत (५५% ऐवजी ५०% गुण) ही अशा उमेदवारांना की ज्यांनी पी.एच.डी. पदवी धारण केली आहे आणि त्यांनी पदव्युत्तर पदवी ही १९ संप्टेबर १९९१ पूर्वी मिळविली आहे त्यांना देखील लागू असेल.

संबंधित श्रेणी जी, की ५५% गुणांच्या समकक्ष आहे आणि जेथे श्रेणीपध्दती ही मान्यता प्राप्त विद्यापिठामध्ये पदव्युत्तर पदवी स्तरावर लागू आहे, अशी श्रेणी वैध असेल.

२. वरील पात्रतेशिवाय उमेदवाराने विद्यापीठ अनुदान आयोग, सी. एस. आय. आर. यांनी आयोजित केलेली राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने मानांकित केलेली समकक्ष परीक्षा जसे राज्य पात्रता परीक्षा (स्लेट/ सेट) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा उमेदवाराने विद्यापीठ अनुदान आयोग (किमान दर्जा आणि एम.फिल / पी.एच.डी. पदवी प्रदान करण्याचे प्रक्रिया) अधिनियम २००९, २०१६ किंवा २०१८ आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेला सुधारणा अनुसार पी.एच.डी. पदवी प्रदान केलेली आहे त्यांना नेट, स्लेट/ सेट उत्तीर्ण असण्याच्या किमान पात्रता अटी पासून सूट मिळेल.

तथापि स्पष्ट करण्यात येते की, उमेदवारांनी पी.एच.डी. अभ्यासक्रमामध्ये दि. ११ जुलै २००९ पुर्वी नोंदणी केलेली असल्यास त्यांना त्यावेळी अस्तित्त्वात असलेले अधिनियम, नियम इ. च्या तरतुदी की जे पी.एच.डी. प्रदान करणाऱ्या संस्थांनी पारित केलेले आहेत लागू असतील आणि अशा पी.एच.डी. अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना सहाय्यक प्राध्यापक किंवा विद्यापिठ, महाविद्यालय, संस्था यामधील समकक्ष पदांवर भरती आणि नियुक्तीमध्ये नेट, स्लेट/ सेट उत्तीर्ण असण्याच्या किमान पात्रता अटी पासून जर ते खालील अटींची पुर्तता करीत असतील तर त्यांना सूट मिळेल.

अ) उमेदवारास प्रदान केलेली पी.एच.डी. पदवी ही नियमित पध्दतीमध्ये (In regular mode) दिलेली असावी.

ब) पी.एच.डी. संशोधनाचे मुल्यमापन हे कमीत कमी दोन बाह्य परीक्षकांनी केलेले असावे.

क) उमेदवाराच्या पी.एच.डी. पदवीचे मौखिक परीक्षा ही सर्वांकरीता खुली अशी झालेली असावी.

ड) उमेदवाराचे दोन संशोधन लेख की, जे त्याच्या पी.एच.डी. संशोधनाशी संबंधित असतील हे प्रकाशित झालेले असावेत त्यापैकी किमान एक संशोधन लेख हा Refereed Journal मध्ये प्रकाशित केलेला असावा.

इ) उमेदवाराने पी.एच.डी. संशोधनाशी संबंधित किमान दोन संशोधन लेख हे विद्यापिठ अनुदान आयोग / आय.सी. एस.एस.आर/ सी.एस.आय.आर. किंवा कोणत्याही समकक्ष संस्थेमार्फत प्रायोजित/अनुदानित/पुरस्कृत परिषद / परिसंवाद यामध्ये सादर केलेले असावे.

टिप : सदरच्या अटींचे पालन उमेदवाराने केलेले आहे असे संबंधित विद्यापिठाच्या कुलसचिव किंवा अधिष्टाता (शैक्षणिक उपक्रम) यांनी प्रमाणित केलेले असावे.

किंवा

**ब.** उमेदवाराने पी.एच.डी. पदवी प्राप्त केलेले विद्यापिठ / संस्था याचा समावेश प्रथम ५०० जागतिक विद्यापिठांच्या मानांकामध्ये त्याचा कोणत्याही एकावेळी खालील एकाप्रमाणे समावेश असावा.

(i) Quacquarelli Symonds (QS);

(ii) The Times Higher Education (THE) or

(iii) The Academic Ranking of World Universities (ARWU) of the Shanghai Government Resolution No.: Misc-2018/C.R.56/18/UNI-1 Page 7 of 60 Jiao Tong University (Shanghai).

आवेदन शुल्क रु.८००/- सर्वसामान्य प्रवर्गाकरिता
आणि रु. ४००/- मागासवर्गीय प्रवर्गाकरिता

जाहिरात मंजूर दिनांक २२/०२/२०१९ सदरची आवेदनपत्रे जाहिरात प्रकाशित झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत प्राप्त होतील अशी दाखल करावी.

पासपोर्ट फोटो चिकटवावा स्टेपल करु नये.

**महाराष्ट्र शासन**

# शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई

**आवेदन पत्र (सहाय्यक प्राध्यापक (विधी) करिता)**

**(कृपया आवेदनपत्र भरण्यापूर्वी जाहिरात व त्यातील तपशील काळजीपूर्वक वाचावे)**

आवेदनपत्र देत असलेल्या पदाचे नावः ----------------------------------------

१) संपूर्ण नावः

_______________________________________________

आडनाव सुरुवातीस

_______________________________________________

२) संपर्क साधण्याकरिता पत्ताः

_______________________________________________

_______________________________________________

दूरध्वनी क्रमांक : (निवास): ________________ (कार्यालय): ______________ (भम्रणध्वनी क्र.):___________ फॅक्स नं. _____________________ ई-मेल आय डी::_______________________________________________

३) कायमचा पत्ताः

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

४) राष्ट्रीयत्व :_______________ _अधिवासाचे राज्यः __________________________________________

कृपया सांक्षकित केलेली पासपोर्ट/आधार कार्ड/वाहनचालक परवाना यांची छायांकित प्रत राष्ट्रीयत्वाचा पुरावा म्हणून आणि साक्षांकित केलेली आणि सक्षम अधिका-याने दिलेल्या अधिवास प्रमाणपत्र /जन्माचा दाखला यांची छायांकित प्रत जोडावी.

५) (अ) जन्म दिनांक : _____________________________________

(ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकास असलेले वयः

वर्षः______________ महिनेः ________________ दिवसः__________

कृपया सांक्षाकित केलेली एस.एस. सी. बोर्ड प्रमाणपत्र किंवा सक्षम अधिका-याने दिलेले वय प्रमाणपत्र यांची छायांकित प्रत दाखल करावी.

६) उमेदवाराचा प्रवर्ग अ. जा., विजाअ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इमाव, आदुघ (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) आणि खुला : होय/नाही

प्रवर्ग नमूद करावा:____________________ जात:____________________________________

(साक्षांकित केलेले सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र जोडावे )

७) शैक्षणिक गुणवत्ता: (कृपया गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रे अनुक्रमणिकेप्रमाणे जोडावीत)

| परीक्षा/ पदव्या | परीक्षेचे नाव | विद्यापीठ /बोर्ड | श्रेणी | किती प्रयत्नात | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | गुणांची टक्केवारी | प्रमुख विषय व पारंगत केलेला विषय | प्रावीण्य/ बक्षीसे/ मेडल्स (पदके) मिळविली असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पी. एच. डी. (विधी) असल्यास | | | | | | | | |
| पी. एच. डी. यु.जी.सी. च्या कोणत्या रेग्युलेशनच्या अधीन पुर्ण केलेली आहे. | | | | | | | | |
| एम.फील. (विधी) असल्यास | | | | | | | | |
| पी.जी. (१)एल.एल.एम. (२) इतर (जर असतील) | | | | | | | | |
| यु.जी (१) एल. एल.बी. (२) इतर (जर असतील) | | | | | | | | |
| एच. एस.सी. | | | | | | | | |
| एस. एस. सी. | | | | | | | | |
| इतर | | | | | | | | |

८) नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण केल्याची माहिती

| नेट/सेट | विषय | प्राप्त गुण (असतील तर) | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | परीक्षा आयोजन करणारी संस्था |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९) विद्यापीठे/महाविद्यालयांमधील शैक्षणिक अध्यापनाचा अनुभव आणि/किंवा विद्यापीठे/महाविद्यालये /राष्ट्रीय स्तरावरील संस्था/ गुणांकन प्राप्त संशोधन संस्था/ उद्योगक्षेत्रांमधील संशोधनाचा अनुभव **(असल्यास)**

**सूचना:** (१) एम.फिल आणि पी. एच. डी. पुर्ण करण्याकरीता घेतलेला कालावधी हा अध्यापन आणि संशोधन अनुभव म्हणून नियुक्तीकरीता गृहीत धरला जाणार नाही.

(२) संशोधनाचे स्वरुप, कालावधीसह संशोधनाचा अनुभव, फेलोशिपचा अनुभव नमुद करण्याकरिता गरज असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. **(असल्यास नमूद करावे)** (२)संबंधीत कार्यालय प्रमुखाचे शैक्षणिक अनुभव/संशोधनाचा अनुभव विशद केलेल्या (कालावधी पासून ते पर्यंत याप्रमाणे नमूद केलेल्या) प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रती जोडाव्या **(असल्यास नमूद करावे)**.

सध्या धारण करीत असलेले पद /नियुक्तीचा प्रकार, वेतन श्रेणी व वेतन **(असल्यास नमूद करावे)**

| संस्थेचे नाव | धारण केलेले पद/ वेतन श्रेणी व वेतन | शैक्षणिक /संशोधन अनुभव | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१) पदवी अभ्यासक्रम______________ वर्षे २) पदव्युत्तर अभ्यासक्रम ________________ वर्षे
एकूण एकत्रित अनुभव (दोघांचा एकत्र) _____________ वर्षे

१०) अध्यापन अनुभव विवरण: घडयाळी (तासिका) तत्त्वावर, मानधन तत्त्वावर/अंशकालीन तत्त्वावर, मानसेवी बिगर मानधन तत्त्वावर/ठोक मानधन तत्त्वावर /ई. **(असल्यास नमूद करावे)**

| संस्थेचे नाव | नियुक्तीचा प्रकार | शैक्षणिक /संशोधन अनुभव | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) शैक्षणिक नाविन्य /नवीन अभ्यासक्रमाची आखणी/अध्ययन - अध्यापन प्रक्रीयेत केलेल्या योगदानाची माहिती **(असल्यास नमूद करावे)**

______________________________________________

१२) अनुक्रमांकानुसार प्रशासकीय कामाचा अनुभव **(जर धारण करीत असतील तर)**

| धारण पद आणि विभागाचे नाव/संस्थेचे नाव | वेतन / वेतन श्रेणी +ॲकडेमीक ग्रेड पे | पासून | पर्यंत | एकूण कालावधी | संस्था सोडून जाण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

राज्याची विद्यापीठे/ राष्ट्रीय विधी विद्यापीठे/स्कुल मधील विविध अधिसत्तावर (Authorities) केलेल्या कामाचा तपशील **(असल्यास नमूद करावे)**:

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

१३) नियुक्ती झाल्यास रुजू होण्याकरिता लागणारा कालावधी:______________________

१४) (अ) किमान वेतन अपेक्षा (जर पदाचे किमान वेतन मान्य नसेल तर): ______________________
(ब) अधिकच्या वेतनाची मागणी आहे की अपेक्षा :______________________

(**सूचना**: लास्ट पे प्रोटेक्शन हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांच्या आणि प्रक्रीयेच्या अधिन असेल.)

## हमीपत्र

मी ______________________________ जाहिर करतो की, उपरोक्त नमूद माहिती ही माझ्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे सत्य आहे. आजपावेतो मला अशा कोणत्याही परिस्थितीतीबद्दल ज्ञान नाही की, ज्यामुळे मी सहाय्यक प्राध्यापक (विधी) , शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई या पदाकरिता /सेवेकरिता मी तंद्रुस्त नसेल. मला आजपावेतो विद्यापीठ/ महाविद्यालय/ शासकीय सेवेमधून बरखास्त केलेले नाही.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक :

## ना हरकत प्रमाणपत्र (लागू असल्यास)

प्रमाणित करण्यात येते की, डॉ. /श्री/ श्रीमती /कु.________________________________________

हे/हया_____________ (पदाचे नाव) म्हणून_________ (विषयाचे नाव) या_______________विभागामध्ये___________(कालावधी) पासून ______________ या वेतन / वेतन श्रेणी +ॲकडेमीक ग्रेड पे मध्ये कार्यरत आहेत आणि त्यांचे ॲकडेमीक ग्रेड पे सह मूळवेतन_______________आहे.

या कार्यालयास त्यांची सहाय्यक प्राध्यापक (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई या पदावर निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास / निवड होण्यास कसलीही हरकत नाही आणि सदरच्या पदावर त्यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना विहीत कालावधीमध्ये रुजू होण्याकरिता पदमुक्त करण्यात येईल.

ठिकाण : कार्यालय प्रमुखाची/सक्षम अधिका-याची सही पदनाम आणि शिक्का

दिनांक :

## प्रपत्र अ मधील हमीपत्र

(कृपया महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुबाचे हमीपत्र ) अधिनियम २००५ मधील नियम क्र. ४ वाचावा)

मी______________________________________________________________________श्री/श्रीमती/कु.

.________________________________________________________________________________

/यांचा/ यांची मुलगा/मुलगी /पत्नी, वय वर्षे __________राहणार ________________________ खालीलप्रमाणे हमीपत्र देतो/देते की,

१) मी सहाय्यक प्राध्यापक (विधी / लॉजिक), शासकीय विधी महाविद्याल,मुंबई या पदाकरिता आवेदन पत्र दिलेले आहे.

२) माझ्या आज रोजीपावेतो जिवित अपत्यांची संख्या ______________________ इतकी आहे त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्मास आलेल्या अपत्यांची संख्या ______________________ इतकी आहे. आणि त्यांचे जन्म दिनांक __________________________________ हे आहेत.

३) मी जाहिर करतो की /करते की मला याबाबीची पूर्ण जाणिव आहे की, जर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्मास येणा-या आणि जिवित असणा-या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर मी उपरोक्त नमूद पदाकरिता अपात्र असेल.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक

**हमीपत्र**

मी,----------------------------------------------------------------- जाहिर करतो की, मी आवेदनपत्र आणि इतर माध्यमांतून दिलेली माहिती ही दाखल केलेल्या योग्य कागदपत्रांनुसार आणि माझ्या माहिती आणि विश्वासानुसार सत्य आहे.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक :

**सहाय्यक प्राध्यापक (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई पदावर नियुक्ती संदर्भात महत्त्वाच्या सूचना :-**

१. उमेदवार हा भारताचा नागरिक असावा. त्यासंदर्भात नागरिकत्वाचे कागदपत्र आवेदनपत्रासोबत जोडण्यात यावे.

२.उपरोक्त नमूद पदांचे आरक्षण हे मुख्यता प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून पडताळलेले आहे आणि त्यामध्ये एखादे वेळी परिवर्तनाची संभावना आहे.

३. सहाय्यक प्राध्यापक, (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, 'ए' रोड चर्चगेट, मुंबई या पदाची पात्रता, वेतनश्रेणी ही विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकार यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार असेल आणि त्यामध्ये सदरच्या पदाकरिता शासनाने शासकीय महाविद्यालयांमधील शिक्षकीय पदांकरिता बनविलेल्या विशेष नियमांचा समावेश असेल.

४. उमेदवारांनी अर्जासोबत जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संख्येत प्रमाणपत्रे, कागदपत्रे, बायोडेटा इ. आवेदनपत्रे जाहिरात प्रकाशित झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत दाखल करावी आणि उमेदवारांनी ८०० रुपये (खुला प्रवर्ग) किंवा ४०० रुपये (मागासप्रवर्ग) चा भरणा उच्च शिक्षण मुंबई यांना सोबत जोडलेला QR कोडच्या माध्यमातून ऑनलाईन पेमेंट पध्दतीने करावा. सदरच्या शुल्काची पावती आवेदन पत्रासोबत जोडावी.

५.उमेदवारांनी त्यांच्या सद्याच्या सेवेबाबत आवश्यक माहिती, त्यांचे विरुध्द कार्यवाही केलेले, सुरु असलेले न्यायालयीन खटले, केलेल्या तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे, गुन्हेगारी खटले, शिस्तभंग विषयक कार्यवाही इत्यादी त्यांच्या नियुक्तीबाबत / सेवेबाबत किंवा अन्य बाबींबाबत कार्यवाही केलेली किंवा प्रलंबित असलेली प्रकरणे इ. (असतील तर) त्यांची माहिती सोबत सादर करावी.

६. सहाय्यक प्राध्यापक पदावर नियुक्त उमेदवार हे नविन अंशदायी पेन्शन योजनेनुसार (DCPS) पेन्शन इ. सुविधांकरीता पात्र असतील.

७. सहाय्यक प्राध्यापक पदाचा सेवा निवृत्तीचा अवधी हा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय आणि नियमानुसार निर्धारित केल्याप्रमाणे असेल.

८. उमेदवाराने जर त्यांनी संशोधन कार्य इ. केलेल्या असल्यास **Self-Assessment Proforma for the Performance Based Appraisal System (PBAS)** मधील केवळ **Category III** नामे **RESEARCH, PUBLICATIONS AND ACADEMIC CONTRIBUTIONS** सोबत दिलेल्या नमुन्यात भरुन अर्जासोबत पाठवावे ॲकॅडमिक परफॉर्मन्स इंडिकेटर (API) पध्दतीनुसार

किमान गुणांकन हे Performance Base Appraisal System (PBAS) Table No. II (C) of Appendix III of UGC Regulation २०१० मध्ये नमूद केल्यानुसार प्राप्त केलेले असावे (असल्यास नमूद करावे). गरज असल्यास

९. विहित आवेदनपत्र हे ०२ प्रतिंमध्ये दाखल करण्यात यावे (०१ मूळप्रत आणि ०१ चांगल्या दर्जाच्या छायांकित प्रत). आवेदनपत्रासोबतची कागदपत्रे इ. समान आकारमानाची (लिगल किंवा A4 साईज ) असावी.

१०. उमेदवारांनी अर्जासोबत खालील कागदपत्रे दाखल करावीत

I. साक्षांकित केलेल्या गुणपत्रके, अनुभव प्रमाणपत्रे (अध्यापन, संशोधन, प्रशासन इ. असल्यास), सेवा पुस्तकेची छायाकिंत प्रत की, ज्यामध्ये पूर्वीच्या सेवेच्या औपचारिक नोंद घेतल्या आहेत, जात प्रमाणपत्र (लागू असेल तर), विहित नमुन्यामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र (लागू असेल तर), ना हरकत प्रमाणपत्र (लागू असेल तर), आणि इतर कागदपत्रे की ज्यामध्ये पात्रतेसंदर्भातील प्रमाणपत्रांचा समावेश असेल, जसे पदवीव्युत्तर विधी पदवीची गुणपत्रके, नेट / स्लेट / सेट प्रमाणपत्रे, नेट / स्लेट / सेट सूट प्रमाणपत्रे, पिएच. डी. प्रमाणपत्रे (असल्यास) ही विहित आवेदनपत्रांसोबत म्हणजे (आवेदनपत्राच्या मूळप्रतीसोबत आवेदनपत्राची इतर ०१ छायांकित प्रतींसोबत) दाखल करावीत.

II. प्रकाशनाची प्रमाणपत्रे (असल्यास), सर्व प्रकाशित संशोधनकार्य (असल्यास) साक्षांकित केलेल्या दोन छायांकित प्रतिंमध्ये (आवेदनपत्राच्या मूळप्रतीसोबत आणि आवेदनपत्राच्या इतर एका छायांकित प्रतीसोबत) दाखल करावीत.

III. उमेदवार जे सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत त्यांनी आपली आवेदनपत्रे A.P.I. with Format नियुक्ती, पदनाम, अनुभव व संशोधन Performance Base Appraisal System (PBAS) नुसार **असल्यास** दाखल करावा आणि सोबत संशोधन, प्रकाशन आणि शैक्षणिक योगदानासंदर्भातील (Cat. III) (असल्यास) दाखल करावे, गरज असल्यास अतिरिक्त पृष्ठे जोडावीत. कृपया वेगळया पृष्ठावर अनुक्रमणिका तयार करुन त्यासमोर ज्या पानांवर पृष्ठांवर आणि इतर कागदपत्रे आहेत, शोधता येतील त्यांचा क्रमांक नमूद करावा. टीपः उमेदवार सेवेत असल्यास / उमेदवाराने संशोधन कार्य केले असेल तरच या मुद्दयाअंतर्गत माहिती सोबत जोडावी.

११.उमेदवार जे सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत त्यांनी आपली आवेदनपत्रे A.P.I. with Format नियुक्ती, पदनाम, अनुभव व संशोधन इत्यादि संदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांसह दाखल **असल्यास** करावे, अन्यथा अशा उमेदवारांची पूर्वीची सेवा, पदोन्नती, स्थाननिश्चिती, वेतनवाढ आणि इतर लाभांकरिता गृहीत धरल्या जाणार नाही आणि त्या संदर्भात कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही. वरील लाभांकरिता अग्रेषित केलेली प्रकरणे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांनी त्यासंदर्भात वेळो-वेळी निर्गमित केलेल्या नियमांच्या आणि प्रक्रियेच्या अधीन रहातील.

१२. जे उमेदवार सेवेमध्ये आहेत आणि विहित मार्गाने (Proper Channel) ने आवेदन पत्र सादर करीत आहेत, त्यांच्याकरीता त्यांच्या सद्याच्या कार्यालय प्रमुखाने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र या आवेदन पत्राच्या विहित नमुन्यामध्ये देणे आवश्यक आहे.

१३. सहाय्यक प्राध्यापक, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी स्वतंत्ररीतीने ०५ प्रतींमध्ये आपला बायोडाटा, की ज्यामध्ये त्यांनी केलेल्या सर्व संशोधनाचा (केले असल्यास) उल्लेख करावा. बायोडाटामधील प्रकाशित संशोधन कामाची (केले असल्यास) अनुक्रमणिका त्यांचे विभाजन इ. माहिती तक्त्यामध्ये द्यावी, जेणेकरुन निवड समितीला त्यांनी केलेल्या संशोधन योगदान सहजरीतीने समजणे शक्य होईल.

१४. सहाय्यक प्राध्यापक पदावर शिफारस केलेली व्यक्ती सदरच्या पदावर दोन वर्षाकरीता परिवीक्षा कालावधी तत्त्वानुसार कार्यरत असेल. परिवीक्षा कालावधी जास्तित जास्त एका वर्षाकरीता वाढविला जाऊ शकेल. सदरच्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तिस परिवीक्षाधीन कालावधी यशस्वीरीतीने पुर्ण करावा लागेल. जर सदरची व्यक्ती परिवीक्षाधीन कालावधी यशस्वीरीतीने पुर्ण करण्यास विहित कालावधीमध्ये यशस्वी झाली नाही किंवा विहित कालावधीमध्ये सदरच्या पदाकरीता अयोग्य आढळून आल्यास तीची विनासूचना बडतर्फीकरीता पात्र असेल.

१५. सहाय्यक प्राध्यापक पदावर शिफारस केलेल्या व्यक्तीस मराठी आणि हिंदी भाषेची परीक्षा संबंधित नियमानुसार उत्तीर्ण करणे अनिवार्य असेल, जर त्या व्यक्तिने सदरची परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली नसेल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल.

१६. सहाय्यक प्राध्यापक पदावर शिफारस केलेल्या व्यक्तीस मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे जेणे करुन मराठीतून स्पष्टपणे वाचणे, बोलणे आणि मराठी लिहिणे शक्य असेल.

१७. सहाय्यक प्राध्यापक पदावर शिफारस केलेली व्यक्ती ही संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी नमूद केल्याप्रमाणे संगणक वापराबाबत विहित प्रमाणपत्र धारण केलेली असावी.

१८. सहाय्यक प्राध्यापक पदावर शिफारस केलेली व्यक्ती करिता शासकीय वसतिगृहाचा अधिक्षक / गृहपाल म्हणून कमीत कमी तीन वर्षाकरिता काम करणे आवश्यक केले जावू शकेल.

१९. सहाय्यक प्राध्यापक पदावर शिफारस केलेली व्यक्ती ही महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी बदलीस पात्र असेल.

२०. उमेदवारांचा पुर्वीच्या सेवेचा अनुभव हा त्यांनी विहित केलेली पात्रता धारण करुन विहित निवड प्रक्रियेद्वारे निवड होऊन विद्यापिठाच्या मान्यतेसह सहाय्यक प्राध्यापक अथवा अधिव्याख्याता या पदावर ज्या दिनांकास ते रुजू झाले असतील त्या दिनांकापासून ग्राहय धरण्यात येईल. उमेदवाराने आपल्या सेवा पुस्तकेची छायांकित प्रत की, ज्यामध्ये पूर्वीच्या सेवेच्या अनुभवाची औपचारिक नोंद घेतली आहे दाखल करावी.

२१. उच्च शिक्षण विभागाच्या नियमानुसार एकाच संवर्गातील पदांना देय असलेले भत्ते आणि इतर लाभ हे समान असतात.

२२. उशिरा प्राप्त झालेली, अपूर्ण असलेली, विहीत नमून्यात नसलेली, जाहिरातीत नमूद प्रमाणपत्रे, कागदपत्रे व ०२ प्रतींमध्ये सादर न केलेली अशी आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व त्या संदर्भात उमेदवारां सोबत कसलाही वार्तालाप केला जाणार नाही.

२३. मूळ आवेदपत्र हे उमेदवाराने स्वतःच्या हस्त अक्षरामध्ये भरुन अथवा टंकलिखीत करुन (सर्व मथळयासह ) सादर करावे व त्याच्या सुस्पष्ट सहा छायांकित प्रती देखील सादर कराव्यात. उमेदवारांना विहीत नमूना फॉर्म "अ" मध्ये लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र स्वाक्षरीसह दाखल करणे बंधनकारक असेल.

२४. उमेदवारांनी विहीत नमूण्यामध्ये अर्ज करण्यापूर्वी जाहिरातीमधील सर्व सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात विहीत नमून्यातील कोणताही रकाना कोरा सोडू नये त्याऐवजी निरंक अथवा लागू नाही असे नमूद करावे.

२५. मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवलेल्या जागांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र आणि सक्षम अधिका-यांनी दिलेले विहीत नमुन्यातील जात पडताळणी प्रमाणपत्र सोबत जोडावे तसेच विहित नमुन्यामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या

पात्रतेसाठी प्रमाणपत्र (लागू असेल तर) अन्यथा त्यांचे आवेदन पत्र रद्द करण्यात येईल. मागास प्रवर्गातील असे उमेदवार की जे अन्य राज्याचे रहीवाशी आहेत त्यांना खुल्या प्रवर्गाचे उमेदवार समजले जाईल. (G. R. No.CBC १०८४/५४५७७(१८१३)BCW-५,dt. ०१/११/१९८५& Circular no. CBC-१६८८(२८२९)/MAVAK-५ dt.२९/०७/१९८८.)

२६. सहाय्यक प्राध्यापक, (विधी), शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई या पदाकरीता केवळ विहित नमुन्यातच अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवरांना एकाच पदाकरिता दोन स्वतंत्र संवर्गातून आवेदन दयायचे आहे जसे खुला संवर्ग आणि राखीव संवर्ग त्यांनी सदरच्या संवर्गाकरिता स्वतंत्र आवेदन पत्रे दाखल करावीत. दोन संवर्गाकरिता एकच (समान) आवेदन पत्र स्विकारले जाणार नाही.

२७. आवेदनपत्र, सोबतची प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि वाढीव पाने इ. पंच मशिनने पंच करुन त्याला लेस लाऊन दाखल करावी. स्पायरल बायंडिंग, स्टेपल, पुस्तकाच्या स्वरुपातील बांधणी टाळावी, जेणेकरुन या कागदापत्रांना हाताळणे आणि दफ्तरात त्यांचे जतन योग्यरीतीनेकरणे शक्य होईल.

२८. उमेदवारांनी आपला पासपोर्ट साईज फोटो हा मुख्य आवेदनपत्रावर चिकटवावा, स्टेपल करु नये.

२९. उमेदावारानी मुलाखतीकरीता येताना सोबत सर्व मूळ प्रमाणपत्रे, गुणपत्रिका, मूळप्रकाशने आणि इतर मूळ कागदपत्रे पडताळणीकरीता घेऊन यावीत. सकृतदर्शनी पदांकरीता पात्र असलेल्या उमेदवारांना मुलाखतीकरीता सक्षम प्राधिकरणाने विहित केलेला छाननी निकष लागू करुन त्यानुसार बोलविण्यात येईल. विशेष पडताळणी समितीद्वारे कागदपत्रांच्या पडताळणीचे कामकाज केले लाईल. हजर झालेले उमेदवार जर विहित अटींची / नियमांची पुर्तता करत नसतील तर त्यांची मुलाखत घेतल्या जाणार नाही.

३०. दिलेली जाहिरात, मुलाखत, केलेल्या शिफारशी आणि निवड इ. संदर्भात कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

३१. मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारांना आणि पदावर रुजू होणाऱ्या उमेदवारास कोणताही प्रवास भत्ता, निर्वाह भत्ता  देय असणार नाही.